| | |
|---|---|
| MHJN020011472013 | नियमित दिवाणी दावा क्र.४३३/२०१३<br>होशल्याबाई डोंगरे वि. निलावती डोंगरे व इतर<br>CNRMHJN020011472013 |

## निशाणी क्रमांक ५५ वरील आदेश

सदरचा अर्ज प्रतिवादींनी महत्वाची कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी मिळणेकामी दिला आहे.

२) अर्जातील कथने थोडक्यात पुढील प्रमाणे –

प्रतिवादीने सदरच्या दाव्यात महत्वाची कागदपत्रे सादर केली आहे. सदर कागदपत्रे दाखल करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. यामुळे सदर कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी प्रतिवादीने मागितली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३) वादीतर्फे सदर अर्जास अर्जावरच आपले म्हणणे दिले आहे. प्रतिवादींनी सादर केलेली कागदपत्रे दाव्याशी संबंधीत नाही व ती चुकीची व खोटी आहे. त्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा.

४) प्रतिवादी व वादीतर्फे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) प्रतिवादीतर्फे पुराव्याचे कामी महत्वाची कागदपत्रे सादर केली आहे. सदरची कागदपत्रे दाखल करणे न्यायाच्या दृष्टीने दाखल करणे आवश्यक आहे. त्यानुसार वर्णन यादी

निशाणी क्र.५६ प्रमाणे प्रतिवादींनी सादर केलेली कागदपत्रे सार्वजनिक दस्त नाही. वादीतर्फे अर्जास दर्शविलेला विरोध व कागदपत्रांचे स्वरुप विचारात घेता प्रतिवादींतर्फे सादर केलेली कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी देणे न्यायोचित होणार आहे. या करिता सदरचा अर्ज खर्चाशिवाय मंजुर करण्यात येत आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १ | सदरचा अर्ज खर्चाशिवाय मंजुर करण्यात येत आहे. |
| २ | अर्ज वर्णन यादी निशाणी क्र.५६ सोबत सादर केलेली कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by NANDAKUMAR LAXMAN YEOLEKAR
Date: 2022.06.22 17:51:00 +0530

(एन. एल. येवलेकर)

दिनांकः २२/०६/२०२२

दिवाणी न्यायाधीश व.स्तर

जालना

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय (व.स्तर), जालना

दिनांक : २२/०६/२०२२

सही/-

एम. डी. आढे

लघुलेखक (ग्रेड-३)